“ अशोक कौतिक कोळी यांच्या समग्र साहित्याचा एक विवेचक अभ्यास ”

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्दयापीठ , नांदेडच्या मानवविद्दया शाखेअंतर्गत मराठी विषयातील पीएच. डी. पदवीसाठी सादर करावयाचा संक्षिप्त आराखडा.

संशोधक

पालंचेवार पोतन्ना गंगन्ना

एम. ए. (मराठी) बी.एड , सेट.

मार्गदर्शक

प्रा. डॉ. राजीव वैजनाथराव यशवंते

सहाय्यक प्राध्यापक मराठी विभागप्रमुख

श्री गुरु बुध्दीस्वामी महाविद्दयालय पूर्णा (जं.)

जि. परभणी

“ अशोक कौतिक कोळी यांच्या समग्र साहित्याचा एक विवेचक अभ्यास ”

अनुक्रमणिका

प्रकरण पहिले

अशोक कौतिक कोळी यांचे व्यक्तिमत्व

प्रकरण दुसरे

अशोक कौतिक कोळी यांच्या कथासंग्रहाचा अभ्यास

प्रकरण तिसरे

अशोक कौतिक कोळी यांच्या कादंबरी / कुमार कादंबरीचा अभ्यास

प्रकरण चौथे

अशोक कौतिक कोळी यांच्या कवितासंग्रह / बालकवितासंग्रह यांचा अभ्यास

प्रकरण पाचवे

अशोक कौतिक कोळी यांच्या दोन अंकी नाटक यांचा अभ्यास

प्रकरण सहावे

अशोक कौतिक कोळी यांच्या ललित लेखन संग्रहाचा अभ्यास

प्रकरण सातवे

अशोक कौतिक कोळी यांच्या शब्दकोशाचा अभ्यास

प्रकरण आठवे

अशोक कौतिक कोळी यांच्या समग्र साहित्याचे वाड्.मयीन मूल्यमापन

प्रकरण नववे

उपसंहार

प्रास्ताविक :

20 व्या शतकाच्या उत्तरार्धात मराठी साहित्याचा विस्तार वेगाने सुरु झाले. संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीने त्यास आणखी गती मिळाली. यानंतर मराठी साहित्यात साठोत्तरी प्रवाह सुरु झाला. अनेक साहित्यकांनी वेगवेगळ्या साहित्यकृतींचे लेखन केले.या साहित्यकृतीमधून शहरी आणि ग्रामीण समाज जीवनाचे महत्वपूर्ण बदल घडून येऊ लागले. याचाच परिणाम ग्रामीण जीवनावर दिसून येतो. ग्रामीण साहित्यकारांनी हे बदल अचुक टिपले. जागतिकीकरणामुळे नव्या सहस्त्रकांच्या उबंरठ्यावर असताना ग्रामीण जीवनाची जी भयानक वाताहत झाली, त्याचे वर्णन ग्रामीण साहित्यात दिसुन येते.ग्रामीनांच्या जिवनाचे चित्रण करणारे साहित्य उदयास आले.या साहित्य प्रवाहाने मराठी साहित्यातील अनेक नियम मोडून नवीन साहित्यविश्व उभारले.स्वातंत्र्योत्तर कालखंडानंतर मराठी साहित्यामध्ये प्रामुख्याने कथा, कविता, कादंबरी, नाटक, चरित्र, आत्मचरित्र, आत्मकथन, प्रवासवर्णन यांचे चित्रण प्रचंड प्रमाणात झालेले दिसते. प्रत्येक लेखक हा आपले व्यक्तिमत्त्व मर्यादित न ठेवता बहुआयामी बनवण्यासाठी केवळ एक साहित्यप्रकार न हाताळता अनेक साहित्यप्रकाराद्वारे लेखन करीत होते.

अशोक कौतिक कोळी हे असेच एक बहुआयामी व्यक्तीमत्त्व असलेले एक जिज्ञासू लेखक, कवी, कथाकार, कांदबरीकार आणि नाटकार आहेत. त्यांनी आपल्या साहित्यामधून सर्व स्तरातील माणसांच्या व्यथा, वेदनांचे चित्रण रेखाटले आहे. यामध्ये कूड, आसूड, सूड, अंधार पाडा, कुंधा, छोटा कमांडो, दप्तर, उलंगवाडी, जाग़ले, गावाच्या तावडीतून सुटका, रक्ताळलेल्या तुरी, अशानं आस व्हतं, इत्यादी कादंब-या, कथासंग्रह, नाटक, ललित लेखनसंग्रह यांचा उल्लेख करावासा वाटतो.

साहित्य हे परिवर्तनासाठीचे परिणामकारक धारदार शस्त्र आहे. या दृष्टिकोनातुन साहित्य निर्मिती केलेली दिसुन येते. विशेष करुन सुरुवातीला कथा हा साहित्यप्रकार निर्माण झाला. तो कमी कालावधीतच लोकप्रिय झाला. कथा या साहित्य प्रकारांमध्ये अनेक लेखकांची नावे घेता येतील. अशोक कौतिक कोळी हे स्वातंत्र्योत्तर कालखंडातील एक अग्रगण्य ठरतील, असे लेखक आहेत. त्यांच्या साहित्यातुन ग्रामीण जीवनातील माणूस येताना दिसतो. त्यांच्या साहित्याचा विषय ग्रामीण माणूस, तरुण, बालक झाला. ग्रामीण भागातील कष्टकरी, या खेड्यातील

समाज जीवनाचा विस्तृत आलेख त्याच लोकांच्या भाषेत त्यांनी मांडला. त्या माणसांच्या भावभावना त्यांची जिद्द, चिकाटी, पराक्रम, जगण्यासाठीचा संघर्ष, गाव, गावकी, भाऊ-भावकी, बलुतेदारी, शेती, शेतकरी, भौगोलिक परिस्थिती त्यांचे जीवन, प्रमाणिकपणा, समाज, संस्कृती, श्रध्दा-अंधश्रद्धा, रुढी-परंपरा इत्यादिंचे समिश्र चित्रण त्यांनी त्यांच्या साहित्यात केले.

आज एकविसाव्या शतकात पदार्पण केल्यानंतर स्वातंत्र्यापासुन सुरु झालेले बदलाचे वारे, त्यामुळे बदललेले सामाजिक जीवन व जीवनामागील बदलते सामाजिक संदर्भ, परंपराधिष्ठीतता, धर्मभोळेपणा, शोषण, अस्मानी- सुलतानी कारणे त्यामुळे सामान्य जनांचे जीवन विस्कळीत झालेले आहे. समाज जीवनात बरेचकाही घडत असतांना सामाजिक, राजकीय, आर्थिक, साहित्यिक व ज्ञानविषयक अशा सर्वच-क्षेत्रांमध्ये आत्मशोधाची जाणीव निर्माण करण्याचे सुरु असलेले प्रयत्न व जागतिकर-णाचे युग हा काळाचा पुढे आलेला नवा चेहरा. याचे पडसाद अशोक कौतिक कोळी यांच्या सहित्यामध्ये उमटलेले दिसते.

संशोधनविषय निवडीमागील भूमिका :

एकविसाव्या शतकात देशामंध्ये औद्दयोगिकीकरण , जागतिकीकरण व सर्व क्षेत्रातिल वर्चस्व दिसुन येते, त्यांमुळे स्वातंत्र्य, समता, बंधुता, मानवी हक्क, या मूलभूत तत्वाच्या अभावामुळे ग्रामीण भागातील जनजीवन मरगळल्यासारखे झाले आहे. ही दयनीय परिस्थिती बदलण्यासाठी आमुलाग्र क्रांती झाली पाहिजे. त्यासाठी कथा, कादंबरी, कविता व इतर साहित्य अप्रतिम ठरले आहे.

महाविद्दयालयीन शिक्षण घेत असताना अभ्यासपत्रिकांमधून वेगवेगळ्या वाड्.मयप्रकारांची व वाड्.मयप्रवाहांची ओळख झाली. ` ग्रामीण साहित्य` हा त्यातीलच एक महत्वाचा व प्रतिष्ठाप्राप्त वाड्.मयप्रवाह याची प्रारंभापासून मला असलेली आवड, त्यामध्ये धग, गोतावळ, पाचोळ, बारोमास, तहान, इ. साहित्यकृतीनी माझ्या मनावर भुरळ घातली. यामधील ग्रामीण वास्तव आपलेसे वाटू लागले. माझ्या शेतकरी कुटुंबात जन्म झाला. त्यातुनच पुढे माझा अशोक कौतिक कोळी यांच्या साहित्याशी परिचय झाला. त्यांच्या साहित्यातून अभिव्यक्त झालेले चित्रण हे मला जवळचे वाटू लागले. त्यांनी रेखाटलेली माणसे, त्यांनी केलेले साहित्याचे चित्रण मला जवळचे वाटू लागले. ग्रामीण समाज आणि इतरही जनसामान्य लोकांच्या दु:खाबद्दल, त्यांच्या कौटुंबिक हाल अपेष्टाबद्दल त्यांना

वाटणारी तळमळ आणि या तळमळीतूनच वेदनांचा वैयक्तिक व सामुहीक अविष्कार असणारे साहित्य माझे आस्थाविषयक बनले. मराठी साहित्यकांनी आपल्या सर्जनशील लेखनीने आपल्या साहित्यामधून समाजव्यवस्थेच्या संदर्भात असंख्य मुलभूत स्वरुपाच्या प्रश्नांचे वास्तव चित्रण केलेले आहे. आपल्यावर झालेल्या अन्यायाविषयीचे चित्रण आपल्या साहित्यात केलेले दिसते. तसेच देशाचे स्वातंत्र्य, स्त्रियांचे शील, त्यांची प्रतिष्ठा व सन्मान, पुरुषांचा स्वाभिमान, गरीब आणि श्रीमंत भेद, जातीय शोषणाचे दु:ख, विषमता इत्यादी सर्व प्रकारच्या शोषणातून मूक्ती मिळवण्यासाठी कराव्या लागणा-या संघर्षमय जीवणाचे चपलखपणे दर्शन घडविणा-या कांदब-या मला जवळच्या वाटू लागल्या. तसेच सभोवताली घडणा-या घटना प्रसंगाचे प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष समाजावर परिणाम झाले. साहजिक माझ्याही मनाला ते आपलेसे वाटतात. त्यामुळे मराठीतील साहित्यप्रवाह मला जवळचे वाटू लागले. साहित्यकांच्या बदलत्या लेखन संस्काराकडे माझ्या कल वाढत राहिला.

एकविसाव्या शतकांमध्ये पदार्पण केल्यापासून ग्रामीण जीवनात वाहणारे बदलाचे वारे, त्यामुळे बदलत गेलेली खेडी, बदललेल्या खेड्यातील बदलते ग्रामस्थ व या बदलत्या ग्रामवास्तवामागील बदलते सामाजिक संदर्भ, सुलतानी आणि इन्सानी कारणे त्यामुळे हैराण झालेले सामान्यजन व त्याचे विस्कळीत झालेले जनजीवन यांमध्ये महत्वपूर्ण परिवर्तन झालेली दिसून येतात. आणखी परिवर्तने होत आहेत, त्या परिवर्तनाचा ग्रामीण जीवनावरही परिणाम झाला. तसेच त्याचे चित्रण अशोक कौतिक कोळी यांच्या साहित्यामध्ये कशाप्रकारे केले आहे, याचे कुतूहल माझ्या मनात निर्माण झाले. ह्याच काळामध्ये ग्रामीण जीवनामध्ये सामाजिक, आर्थिक, राजकीय, धार्मिक, सांस्कृतिक स्थित्यंतरे घडत गेली. खाजगीकरण, उदारीकरण, जागतिकीकरण, त्यांचा परिणाम मणूष्याच्या जीवनावर झाला. आधूनिक तंत्रज्ञान, औद्दयोगिकीकरण, प्रसारमाध्यमे या सर्व भौतिक बदलामूळे दलित सुशिक्षित आणि निरक्षर माणसे शहरांकडे वळली आणि त्यांच्या जगण्याच्या जाणिवा बदलल्या. ह्या जाणिवांचे चित्रण अशोक कौतिक कोळी यांच्या समग्र साहित्यात उमटलेले दिसते.

या बदलत्या सामाजिक जाणिवांचा वेध अशोक कौतिक कोळी यांच्या साहित्यामध्ये कशाप्रकारे घेण्यात आला, तसेच जागतिकीकरणानंतर 21 व्या शतकात कोणकोणत्या बाबींचा परिणाम त्यांच्या साहित्यावर झाला. जागतिकीकरणामूळे त्यांचे साहित्य वेगळे का ठरते, याचा शोध घेणे गरजेचे आहे. मुळातच अशोक कौतिक कोळी हे माझे आवडते साहित्यिक आहेत. त्यांच्या साहित्यातून बदलत जाणारे सामाजिक वास्तव दुर्लक्षित राहू

नये, म्हणून मी **'अशोक कौतिक कोळी यांच्या समग्र साहित्याचा एक विवेचक अभ्यास'** हा विषय संशोधनासाठी निवडलेला आहे. तसेच ह्या विषयावर अद्याप संशोधन झालेले नाही. म्हणून मी हा विषय अभ्यासासाठी निवडलेला आहे.

विषय निवडीमागील कारणे :

' अशोक कौतिक कोळी यांच्या समग्र साहित्याचा एक विवेचक अभ्यास ' असा विषय मी माझ्या संशोधनासाठी निवडलेला आहे. स्वातंत्र्योत्तर कालखंडानंतर अनेक प्रकारच्या सांस्कृतिक, राजकीय, आर्थिक, धार्मिक बाबींचा परिणाम जनसामान्यांवर अनुकूल-प्रतिकूल परिणाम झालेला दिसतो. साहजिकच या सर्वांचे पडसाद साहित्यामध्ये उमटताना दिसतात. ग्रामीण साहित्यावरही मोठा परिणाम झाल्याने त्यातील समाजजीवन पध्दतीचे संघर्ष बदलत गेले. साहजिकच ह्या सर्वांचा परिणाम अशोक कौतिक कोळी यांच्या समग्र साहित्यावरही होताना दिसतो.

कोणत्याही विषयावर संशोधन करताना त्या विषयाची व्याप्ती आणि मर्यादा निश्चित करणे गरजेचे असते. त्याशिवाय त्या संशोधनाला पूर्णपणे न्याय देता येत नाही. विषयाचा आवाका मोठा घेऊण उगाचाच फापटपसारा करुन संशोधन यशस्वी होत नाही. प्रत्येक घटकाला समान न्याय देता येत नाही. म्हणून त्या करता एका लेखकाच्या साहित्यकृतींचा अभ्यास करणे गरजेचे असते. म्हणून मी माझ्या संशोधनासाठी **' अशोक कौतिक कोळी यांच्या समग्र साहित्याचा एक विवेचकक अभ्यास '** या विषयाची निवड केलेली आहे.

पुर्व संशोधनाची थोडक्यात पाहणी :

प्रस्तुत विषयावर अद्याप संशोधन झालेले नाही. त्या अनुषंगाने मी खालील प्रबंधिका व प्रबंधाचे वाचन केले.

⟶ मान्यताप्राप्त पीएच. डी. प्रबंध खालीलप्रमाणे :

1. ' निवडक ग्रामीण साहित्यातील दुष्काळाचे चित्रण : एक अभ्यास,' अभ्यासक-खामगळ जयश्री भागवत, मार्गदर्शक - डॉ. मनोहर जाधव , वर्ष - 2006.
2. ' द. ता. भोसले यांच्या साहित्यातील ग्रामीण जीवण,' अभ्यासक - भोसले हरीकृष्णा, मार्गदर्शक - डॉ. अविनाश सांगोलेकर, वर्ष - 2013.

3. 'ग्रामीण साहित्यातील शेतकरी जीवन (रा. रं. बोराडे यांच्या साहित्याच्या अनुषंगाने)', अभ्यासक - दास बाळासाहेब विट्टल, मार्गदर्शक - डॉ. अविनाश सांगोलेकर, वर्ष- 2013.
4. 'आनंद यादव यांच्या कथेतील प्रादेशिकता ', अभ्यासक - वडीतके गंगाराम कोंडीराम, मार्गदर्शक - डॉ. शिंदे अशोक, वर्ष - 2014.
5. '1980 नंतरच्या मराठी ग्रामीण कवितेतील बदलत्या वास्तवाचा शोध.' (1880 ते 1950) अभ्यासक - देशमुख संदिप भाऊसाहेब, मार्गदर्शक - डॉ. जोशी चंद्रकांत, वर्ष - 2012.

संशोधनाची उदिष्टे :

1. अशोक कौतिक कोळी यांचे व्यक्तीमत्त्व जाणून घेणे. 2. अशोक कौतिक कोळी यांच्या साहित्याचे स्वरुप जाणून घेणे. 3. अशोक कौतिक कोळी यांच्या साहित्यातील सामाजिक, आर्थिक,राजकीय, सांस्कृतिक परिस्थिती जाणून घेणे.
4. अशोक कौतिक कोळी यांच्या काळातील भाषाशैलीच्या अभ्यास करणे.
5. अशोक कौतिक कोळी यांच्या साहित्याची सामाजिक दृष्टीने चिकित्सा करणे.
6. अशोक कौतिक कोळी यांच्या काळातील बदलाच्या परिणामांचा परामर्श घेणे.
7. अशोक कौतिक कोळी यांच्या साहित्याचे वाड.मय मूल्यमापन करणे.
8. अशोक कौतिक कोळी यांच्या साहित्यातील समाजजीवनाच्या व्यथा,वेधना, रुढी-परंपरा
9. यांचा शोध घेणे व समाजजीवणावर झालेल्या परिणामांचा शोध घेणे.
10. आधुनिकिकरणाचा तत्कालिन समाजावर झालेल्या परिणामांचा शोध घेणे.
11. अशोक कौतिक कोळी यांच्या साहित्यातुन प्रकट झालेल्या मानवी प्रवृतींचा वेध घेणे.

वापरावयाच्या संशोधन पध्दती आणि स्विकारायची ध्येय धोरणे :

कोणत्याही विषयाचे संशोधन करीत असताना त्या संशोधनाला योग्य दिशा मिळावी ते संशोधन चांगल्या दर्जाचे व्हावे, ह्यासाठी शात्रशुध्द रितीने ते करणे गरजेचे असते. संशोधन करित असताना आपल्याला संशोधन पध्दतीचा वापर करावा लागतो. ह्या पध्दतीचा वापर करुन आपण चांगले संशोधन करु शकतो. तत्कालीन ग्रामीण समाज जीवनाचे वास्तव त्यांच्या व्यथा, वेदना, अन्याय, शोषण, रुढी, परंपरा, चालिरिती, तत्कालीन समाजावर आधुनिकिकरणाचा परिणाम त्यांची बदलत जाणारी जिवनपध्दती

यांचे वास्तव दर्शन अशोक कौतिक कोळी यांच्या साहित्यातुन घडते, म्हणून मी `अशोक कौतिक कोळी यांच्या समग्र साहीत्याचा अभ्यास` या विषयाचा अभ्यासाकरिता **चरित्रात्मक**, **वर्णनात्मक, ऐतिहासिक, समाजशास्त्रीय आणि मानसशात्रीय** या संशोधन पध्दतीचा अवलंब करणार आहे. त्यामुळे माझे सदरचे संशोधन हे फक्त अशोक कौतिक कोळी यांच्यासाहित्यावरच अवलंबुन असेल.

वरिल विषयाचे संशोधन अधिकाधिक वास्तववादी व काटेकोरपणे व्हावे, त्यासाठी मी मन:पुर्वक प्रयत्न करणार आहे. त्या अनुशंगाने मी `अशोक कौतिक कोळी यांच्या समग्र साहित्याचा अभ्यास` या विषयाचा अभ्यास करणार आहे. हा सर्व अभ्यास करताना मी कोणत्याही पूर्वगृह, गैरसमज ह्यांना थारा न देता तटस्थ व चिकित्सक वृत्तीने करणार आहे.

संकल्पित प्रकरणांची क्रमश: मांडणी :

‘ अशोक कौतिक कोळी यांच्या समग्र साहित्याचा एक विवेचक अभ्यास ’

या प्रस्तुत विषयाच्या अनुषंगाने अभ्यास करित असताना त्यात सुयोग्यपणा यावा. या हेतूने विषयाची रचना नऊ प्रकरणात करण्यात आली आहे. ती प्रकरणे पुढील प्रमाणे -

प्रकरण पहिले - अशोक कौतिक कोळी यांचे व्यक्तिमत्व

प्रकरण दुसरे - अशोक कौतिक कोळी यांच्या कथासंग्रहाचा अभ्यास

प्रकरण तिसरे - अशोक कौतिक कोळी यांच्या कादंबरी / कुमार कादंबरीचा अभ्यास

प्रकरण चौथे - अशोक कौतिक कोळी यांच्या कवितासंग्रह / बालकवितासंग्रह यांचा अभ्यास

प्रकरण पाचवे - अशोक कौतिक कोळी यांच्या दोन अंकी नाटकाचा अभ्यास

प्रकरण सहावे - अशोक कौतिक कोळी यांच्या ललित संग्रहाचा अभ्यास

प्रकरण सातवे - अशोक कौतिक कोळी यांच्या शब्दकोशाचा अभ्यास

प्रकरण आठवे - अशोक कौतिक कोळी यांच्या समग्र साहित्याचे वाड्.मयीन मूल्यमापन

प्रकरण नववे - उपसंहार

“ अशोक कौतिक कोळी यांच्या समग्र साहित्याचा एक विवेचक अभ्यास ”

प्रकरणाचा संक्षिप्त आराखडा

प्रकरण पहिले :

“ अशोक कौतिक कोळी यांचे व्यक्तीमत्व ”

1.1. प्रास्ताविक

1.2. अशोक कौतिक कोळी यांचा परिचय

1.3. अशोक कौतिक कोळी यांच्या व्यक्तिमत्वाची जडणघडण

1.4. अशोक कौतिक कोळी यांच्या साहित्याचा परिचय

1.5. अशोक कौतिक कोळी यांच्या साहित्याची प्रेरणा

1.6. अशोक कौतिक कोळी यांच्या साहित्याचे स्वरुप व वैशिष्टे

1.7. अशोक कौतिक कोळी यांचे सामाजीक स्थान

1.8. समारोप

1.9. संदर्भ आणि टिपा

प्रकरण दुसरे :

अशोक कौतिक कोळी यांच्या कथासंग्रहाचा अभ्यास

2.1. प्रास्ताविक

2.2. अशोक कौतिक कोळी यांच्या कथेची आशयविश्व

2.3. अशोक कौतिक कोळी यांच्या कथेतील समाजव्यवस्था

2.4. अशोक कौतिक कोळी यांच्या कथेतील व्यक्तिरेखा

2.5 अशोक कौतिक कोळी यांच्या कथेतील ग्रामीण जीवनाची परवड

2.6 अशोक कौतिक कोळी यांच्या कथेतील शेतकरी जीवनाचे चित्रण

2.7 अशोक कौतिक कोळी यांच्या कथेतील स्त्रीचित्रण

2.8. अशोक कौतिक कोळी यांच्या कथेची वैशिष्टे

2.9. अशोक कौतिक कोळी यांच्या कथेचे वेगळेपण

2.10. समारोप

2.11 संदर्भ आणि टिपा

प्रकरण तिसरे :

`अशोक कौतिक कोळी यांच्या कादंबरी / कुमार कादंबरी अभ्यास`

3.1. प्रास्ताविक

3.2. अशोक कौतिक कोळी यांच्या कादंबरीचे आशयविश्व

3.3. अशोक कौतिक कोळी यांच्या कादंबरीतील समाजव्यवस्था

3.4 अशोक कौतिक कोळी यांच्या कादंबरीतील व्यक्तीरेखा

3.5 अशोक कौतिक कोळी यांच्या कादंबरीतील ग्रामीण जीवणाची परवड

3.6 अशोक कौतिक कोळी यांच्या कादंबरीतील शेतकरी जीवनाचे चित्रण

3.7. अशोक कौतिक कोळी यांच्या कादंबरीतील स्त्रीचित्रण

3.8. अशोक कौतिक कोळी यांच्या कादंबरीची वैशिष्टे

3.9. अशोक कौतिक कोळी यांच्या कादंबरीचे वेगळेपण

3.10. समारोप

3.11. संदर्भ व टिपा

प्रकरण चौथे :

`अशोक कौतिक कोळी यांच्या कवितासंग्रह / बालकवितासंग्रह यांचा अभ्यास`

4.1. प्रास्ताविक

4.2. अशोक कौतिक कोळी यांची काव्यभाषा

4.3. कवितेतील प्रदेशचित्रण

4.4. कवितेतील राजकीय आणि सामाजिक चित्रण

4.5. स्त्रीविषयक चित्रण

4.6. प्रतिमा आणि प्रतिके

4.7. ग्रामीण जीवनातील संवेदना

4.8. कवितेतील वैशिष्टे

4.9. समारोप

4.10. संदर्भ आणि टिपा

प्रकरण पाचवे :

`अशोक कौतिक कोळी यांच्या दोन अंकी नाटक यांचा अभ्यास`

1.प्रास्ताविक

2.अशोक कौतिक कोळी यांच्या नाटकाचा आशय

3.अशोक कौतिक कोळी यांच्या नाटकातील व्यक्तिरेखा

4.अशोक कौतिक कोळी यांच्या नाटकातील समाजव्यवस्था

5.अशोक कौतिक कोळी यांच्या नाटकाची वैशिष्टे

6.समारोप

7.संदर्भ आणि टिपा

प्रकरण सहावे :

`अशोक कौतिक कोळी यांच्या ललित लेखन संग्रहाचा अभ्यास`

1. प्रास्ताविक
2. अशोक कौतिक कोळी यांच्या ललित लेखनाचा आशय
3. अशोक कौतिक कोळी यांच्या ललित लेखनाची भाषाशैली
4. अशोक कौतिक कोळी यांच्या ललित लेखनाची वैशिष्टे
5. समारोप
6. संदर्भ आणि टिपा

प्रकरण सातवे :

अशोक कौतिक कोळी यांच्या शब्दकोशाचा अभ्यास

1. प्रास्ताविक
2. अशोक कौतिक कोळी यांच्या शब्दकोशातील तावडी भाषा
3. अशोक कौतिक कोळी यांच्या शब्दकोशाची वैशिष्टे
4. समारोप

5. संदर्भ व टिपा

प्रकरण आठवे :

`अशोक कौतिक कोळी यांच्या समग्र साहित्याचे वाड.मयीन मूल्यमापन`

5.1. प्रास्ताविक

5.2. अशोक कौतिक कोळी यांच्या साहित्याचा आशय

5.3. अशोक कौतिक कोळी यांच्या साहित्यातील निवेदन पध्दती

5.4 अशोक कौतिक कोळी यांच्या साहित्यातील प्रसंगनिर्मिती

5.5.अशोक कौतिक कोळी यांच्या साहित्यातील वातावरण निर्मिती

5.3.1. राजकीय स्थिती

5.3.2. हिंसा आणि भ्रष्टाचाराचे वातावरण

5.3.3. समाजनिष्ठ, जातिनिष्ठ ताणतणावाचे चित्रण

5.3.4. देशियता

5.6. अशोक कौतिक कोळी यांच्या साहित्यातील संवादकौशल्य

5.7. अशोक कौतिक कोळी यांच्या साहित्याची भाषाशैली

5.7.1. स्त्रीयांची भाषा

5.7.2. आर्थिक स्तरानुसार भाषाभेद

5.7.3. भाषाद्वित्व व द्विभाषिकता

5.7.4. म्हणी व वाक्यप्रचार

5.7.5. प्रतिमा, प्रतिके आणि अलंकार

5.8. अशोक कौतिक कोळी यांच्या साहित्यातील अधोरेखीत विविध वर्गातील स्त्रीजीवन

5.8.1. सुरक्षित, नोकरदार स्त्रियांचेजीवन

5.8.2 मजुर स्त्रियांचे जीवन

5.9. अशोक कौतिक कोळी यांच्या समग्र लेखनाची वैशिष्टे

5.10. समारोप

5.11. संदर्भ आणि टिपा

प्रकरण नव्वे :

`उपसंहार`

6.1. प्रास्ताविक

6.2. मागिल पाच प्रकरणांची थोडक्यात पाहणी

6.3 निष्कर्ष आणि निरिक्षणे

8. परिशिष्टे :

1. अशोक कौतिक कोळी यांचा जीवनपट

2. अशोक कौतिक कोळी यांचे छायाचित्र

3. अशोक कौतिक कोळी यांचे हस्ताक्षर

4. अशोक कौतिक कोळी यांच्या साहित्यकृतींची मुखपृष्टे

5. अशोक कौतिक कोळी यांच्या साहित्यकृतींचे मलपृष्टे

9. दर्शिका :

1. व्यक्तीनामसुची

2. ग्रंथनामसुची

3. स्थलनामसुची

4. नियतकालिकसुची

10. संदर्भसूची :

1. साधनसूची :

⟹ अशोक कौतिक कोळी यांचे **कथासंग्रह**

1. कूड
2. आसूड
3. सूड
4. उलंगवाडी

⟹ अशोक कौतिक कोळी यांच्या **कादंब-या**

1. पाडा
2. कुंधा
3. गावाच्या तावडीतुन सुटका
4. रक्ताळलेल्या तुरी

⟹ अशोक कौतिक कोळी यांच्या **कुमार कादंब-या**

1. छोटा कमांडो
2. दप्तर

⟹ अशोक कौतिक कोळी यांच्या **कवितासंग्रह / बाल कविता**

1. गावाकडल्या कविता
2. माझ्या गावाला जाऊ
3. वाघुरचं पाणी

⟹ अशोक कौतिक कोळी **दोन अंकी नाटक**

1. जागले

⟹ अशोक कौतिक कोळी यांचा **ललित लेखनसंग्रह**

1. अशानं आसं व्हतं

⟹ अशोक कौतिक कोळी यांचा **शब्दकोश**

1. तावडी बोली

2. सहाय्यक सुची (निवडक नोंदी)

1. गंधारे द. के. (संपा.), `मराठी वाड.मय प्रकार : स्वरुप, संकल्पना व वाटचाल,` शब्दालय प्रकाशन, श्रीरामपुर जाने- 2017

2 .कुलकर्णी द. भि. कादंबरी स्वरुप व समिक्ष,`पद्मगंधा प्रकाशन, पुणे,11 मार्च2010

3. शेळके भास्कर, ` मराठी प्रादेशिक कादंबरी : स्वरुप आणि विश्लेषण,` शब्दालय प्रकाशन श्रीरामपुर, 25 एप्रिल 2012

4.साळवे शशिकांत, `आधुनिक कादंबरी आणि मराठी लेखिका,` स्वरुप प्रकाशन, औरंगाबाद, 15 ऑगस्ट 2010

5. थोरात हरिश्चंद्र,` कादंबरीविषयी,` पद्‌दमगंधा प्रकाशन, पुणे, जुन 2006

6. देशमुख गणेश, ` ग्रामीण समाजजीवन व साहित्य,`

7. यादव आनंद, ` ग्रामीण साहित्य स्वरुप आणि समस्या,`

8 .मुलाटे वासुदेव, ग्रामीण कथा : स्वरुप व विकास

9. ठाकुर रविंद्र , `मराठी ग्रामीण कादंबरी,`

10. नलगे चंद्रकुमार (संपा.), ग्रामीण वाड.मयाचा इतिहास.`

(टिप : प्रस्तुत संशोधनाच्या रुपरेषेमध्ये संशोधनाअंती थोडाफार बदल होण्याची शक्यता आहे.)

संशोधक

पालंचेवार पोतन्ना गंगन्ना

एम. ए. (मराठी) बी.एड,सेट

मार्गदर्शक

प्रा. डॉ. राजीव वैजनाथराव यशवंते

सहाय्यक प्राध्यापक

मराठी विभागप्रमुख

श्री गुरु बुध्दीस्वामी महाविद्दयालय

पूर्णा

(जं.) जि.परभणी